**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० मजला, मुंबई ४००००१
क्रमांक: कोरोना- २०२१/प्र.क्र.३६६/आ-५,
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२१.

संदर्भ :
१) साथरोग अधिनियम, १८९७.
२) आपत्ती निवारण कायदा, २००५.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन समक्रमांक दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ चे आदेश.

**शासन आदेश**

**ब्रेक द चेन अंतर्गत - राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय व खाजगी व औद्योगिक आस्थापनांमध्ये मास्कचा वापर बंधनकारक करणे तसेच कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण तातडीने पूर्ण करण्याबाबत**

ज्याअर्थी, राज्यात साथरोग प्रतिबंध अधिनियम,१८९७ व आपत्ती निवारण कायदा, २००५ ची अंमलबजावणी सुरु आहे.

ज्याअर्थी, कोविड-१९ प्रादुर्भावामुळे लावण्यात आलेल्या लॉकडाऊन अंतर्गत लावण्यात आलेल्या निर्बंधांमध्ये रुग्णसंख्या आटोक्यात येत असतांना अर्थचक्रास चालना देण्यासाठी निर्बंधांमध्ये शिथिलता देण्यात आली. त्यामुळे गर्दीव्यवस्थापन, शारीरिक अंतर पाळणे व मास्कचा वापर करण्यामध्ये नागरिकांकडून शिथिलता व निष्काळजीपणा झाल्याने राज्याला कोविड-१९ बाधेच्या तीव्र लाटेचा सामना करावा लागला,

त्याअर्थी, कोविड-१९ बाधेच्या लाटेची द्विरुक्ती टाळण्यासाठी आता सक्षम प्राधिकारी तसेच अध्यक्ष, राज्य व्यवस्थापन समिती यांना मिळालेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

१) राज्यातील मंत्रालय/ अधिनस्त कार्यालय/ विधानभवनासह सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये व खाजगी आस्थापनामध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच कार्यालयात कामकाजास्तव येण्याऱ्या सर्व अभ्यागतांनाही कार्यालय व कार्यालयाच्या आवारात नाक व तोंड पूर्णत: झाकले जाईल अशा पध्दतीने मास्क वापरणे बंधनकारक राहील.

२) राज्यातील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये व खाजगी आस्थापनामध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण झाल्याची खातरजमा संबंधित कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख / आस्थापना प्रमुख यांनी करावी व कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण झाल्याचे अंतिम

Scanned with CamScanner

प्रमाणपत्र संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घ्यावे. ज्या कर्मचाऱ्यांचे लसीकरणासाठी काही अडचण असल्यास नजीकच्या लसीकरण केंद्रात किंवा सार्वजनिक आरोग्य विभागात संपर्क करुन कार्यालयीन अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी लसीकरणाचे विशेष सत्र आयोजित करावे, जेणेकरुन सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे लसीकरण पूर्ण होईल याची खातरजमा करावी.

३) सर्व प्रकारच्या कार्यालयीन आस्थापनांनी दैनंदिन कामकाजादरम्यान मास्कचा सुयोग्य वापर तसेच लसीकरण पूर्ण करुन घेणे, यावर देखरेख करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे आस्थापना अधिकारी किंवा एका अधिका-याल नामनिर्देशित करतील.

४) सर्व कार्यालय व कार्यालयाच्या आवारात अभ्यागतांसह मास्कचा वापर अनिवार्य करण्यात येत असल्याने विनामास्क वावरणा-या अभ्यागत/ कर्मचारी/अधिकारी यांना संबंधित अभ्यागत/ कर्मचारी/अधिकारी ज्या विभागाच्या क्षेत्रात/आवारात विनामास्क आढळला त्या कार्यालयाच्या नामनिर्देशित अधिकारी (कार्यालय प्रमुखाने नामनिर्देशित केलेला अधिकारी ) दंड करण्यास सक्षम प्राधिकारी राहील.

५) सक्षम प्राधिकारी विनामास्क आढळणा-या अभ्यागत/कर्मचारी/अधिका-यांना दंड आकारणी करुन त्याबाबतची पावती देईल. सक्षम प्राधिकारी सदर दंडाची रक्कम संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिका-याकडे जमा करेल व आहरण व संवितरण अधिकारी सदर दंडाची रक्कम खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखालील असलेल्या जमा सांकेतांकाखाली भरणा करेल.

| मराठी | English |
|---|---|
| महसूल जमा | Revenue Receipt |
| (सी) इतर कराव्यतिरिक्त महसूल | (c) Other non-Tax Revenue |
| (एक) सर्वसाधारण सेवा | (I) General services |
| ००७० - इतर प्रशासनिक सेवा | 0070 -Other Administrative Services |
| ८०० इतर जमा रक्कम | 800 Other Receipts |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सीताराम कुंटे) 26/10/21
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई,

Scanned with CamScanner

५) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई. (सर्व)
८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक, एनएचएम, मुंबई.
१४) धर्मदाय आयुक्त एम. एस. मुंबई.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य आरोग्य विमा संस्था, वरळी, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सर्व महानगरपालिका आयुक्त,
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, ज़िल्हा परिषद.
२०) संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे.
२१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
२२) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२३) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२४) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व),
२५) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२६) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
२७) निवड नस्ती (आ-५),

Scanned with CamScanner